श्री.किशनराव वरखिडे यांची अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष म्हणून नेमणूक व त्यांना राज्यमंत्र्यांचा दर्जा देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**रोजगार व स्वयंरोजगार विभाग,**
शासन निर्णय क्रमांक इडब्ल्यूएस १६९८/४३२/रोस्वरो-४,
नवीन प्रशासकीय भवन, १४ वा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक ९ डिसेंबर, १९९८.

वाचा : १) सार्वजनिक उपक्रम केंद्र, शासन निर्णय क्रमांक-शासाऊ १०९१/ सीआर-१/९१/साऊ, दिनांक १८.१०.१९९१
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-मुमंस ११९२/ प्र.क्र.१२/का.२१, दिनांक १६.११.१९९३.

**शासन निर्णय :**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या बेरोजगारांच्या आर्थिक उन्नतीसाठी शासनाने "अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची" स्थापना करण्याचा निर्णय घेतला आहे. या महामंडळाचे अंशकालीन अध्यक्ष म्हणून श्री.किशनराव वरखिडे यांची नेमणूक करण्याचा व त्यांना राज्यमंत्र्यांचा दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयास अधिन राहून अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित संस्थापन समयलेख आणि संस्थापन नियमावलीतील नियम क्रमांक ८२(२) अन्वये श्री.किशनराव वरखिडे, एन.डी.४, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेजवळ, सिडको, नवीन नांदेड-४३१ ६०३ यांची प्रथम संचालक म्हणून आणि त्यानंतर याच शासन निर्णयान्वये संचालक मंडळाचे अंशकालीन अध्यक्ष म्हणून त्यांनी कार्यभार स्विकारल्या दिनांकापासून तीन (३) वर्षाकरिता त्यांची नियुक्ती करण्यात येत आहे. तथापि या नियुक्तीच्या कालावधीत कमी/अधिक बदल करण्याचा अधिकार शासनास आहे.

२. महामंडळाचे अंशकालीन अध्यक्ष या नात्याने श्री.वरखिडे यांना राज्यमंत्री पदाचा दर्जा देण्यात येत असून या शासन निर्णयामध्ये अंतर्भूत सोयी-सुविधा व्यतिरिक्त राज्यमंत्री पदाच्या दर्जास देय इतर सोयी-सुविधांबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

३. श्री.किशनराव वरखिडे हे या महामंडळाच्या अंशकालीन अध्यक्षपदी असेपर्यंत त्यांना खालीलप्रकारच्या सोयी-सुविधा पुरविण्यात येतील -

| | |
|---|---|
| १) मानधन | रुपये ३०००/- दरमहा |
| २) संचालकांच्या मंडळाच्या बैठकीस उपस्थित राहण्याकरिता बैठक भत्ता/फी | रुपये १५०/- प्रती बैठक |
| ३) निवासी दूरध्वनीच्या दरमहा खर्चाची प्रतीपूर्ती | रुपये १०००/- |
| ४) कार्यालयीन कामकाजासाठी उपक्रमाच्या वाहनांच्या इंधन व तेलासाठी (वाहनचालकासह वापर अनुज्ञेय) | रुपये १८,०००/- प्रती वर्षी |
| ५) संचालक मंडळाच्या बैठकीनिमित्त अध्यक्षाची राहणे व किरकोळ बाबीवरील खर्च पुढील मर्यादेपर्यंत करता येईल. | मुंबई - रुपये ३००/- प्रती दिन<br>नागपूर,पुणे रुपये २००/-प्रती दिन<br>नाशिक व औरंगाबाद राज्यातील इतर ठिकाणी रुपये १५०/- प्रती दिन |

KV

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
24 DEC 1998
शाखा
प्र. शि. नि. उ. शि. लि. अधिकारी

वरील अनुक्रमांक (५) नुसार उपक्रमाने राहण्याची/जेवणाची सोय पुरविली असेल अथवा त्यासाठी खर्च केला असेल तर अध्यक्षांना देय दैनिक भत्याचे दर हे शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक: टीआरए १०७७/१५६/सी/एसईआर-५, दिनांक ११-८-१९७७ च्या परिच्छेद १३ च्या धर्तीवर परिगणीत करावेत.

४. वरील सर्व बाबींवर होणारा खर्च मागणी क्रमांक-झेडए-१, २२३०-कामगार व सेवायोजन- ०२- सेवायोजन - पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना - ००४, संशोधन, सर्वेक्षण व सांख्यिकी, ००४ (आठ) राज्यातील आर्थिकदृष्टया मागासवर्गाच्या विकासाकरिता अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची स्थापना - २० इतर खर्च, (२२३० १२७ ९) या लेखाशीर्षाखालील तरतूदीतून भागविण्यात यावा व व्यवस्थापकीय संचालक, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ यांना देयके सादर करुन त्यांच्या मंजूरीने अदा करण्यात यावीत.

५. हा शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ अनुक्रमे क्रमांक २२९/का-१४४३, दिनांक १९.११.१९९८ आणि क्रमांक-७४८०/का-साऊ-२, दिनांक २५-११-९८ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(र.ग.पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
महालेखापाल, महाराष्ट्र-१ लेखा व अनुज्ञेयता, मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२, लेखा व अनुज्ञेयता, नागपूर
महालेखापाल, महाराष्ट्र-१, लेखापरीक्षा, मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२, लेखा परीक्षा, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी
प्रधान सचिव, नियोजन विभाग
प्रधान सचिव, वित्त विभाग
मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
संचालक, रोजगार व स्वयंरोजगार म.रा. कोकण भवन, नवी-मुंबई
वित्त विभाग ( व्यय-५) अर्थसंकल्प, मंत्रालय, मुंबई
नियोजन विभाग, कार्यासन क्र. १४४३ मंत्रालय, मुंबई
सर्व जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र,
रोजगार व स्वयंरोजगार विभागातील सर्व कार्यासन
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा पोलिस अधिक्षक,
निवड नस्ती

KP

24 DEC 1998